सच्छिद्र निचरा प्रणालीचा वापर करून (Sub Surface Drainage System) मौजे मजरेवाडी, आकीवाट, तेरवाड-१ व तेरवाड-२ ता. शिरोळ, जि. कोल्हापूर या गावातील क्षारपड जमीन सुधारणा प्रकल्पास राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत मंजूरीबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांक: राकृवि ०२१९ /प्र.क्र. ७४/१४-अे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : ०८ मार्च, २०१९

संदर्भ :

१. राज्य स्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या (SLSC) २५ व्या बैठकीचे इतिवृत्त- पत्र क्र. आरकेव्ही-०५१८/प्र.क्र.१६२/१४-अे, दि. २७ ऑगस्ट, २०१८, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

२. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, केंद्रिय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. ११-९/२०१६-NRM-I, दि. ०४/०२/२०१९

३. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, केंद्रिय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०१८ आरकेव्हीवाय, दि. १३/०२/२०१९

प्रस्तावना :

राष्ट्रीय कृषि विकास योजना केंद्र व राज्य शासनाच्या ६०:४० अर्थसहाय्याच्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत जलसंधारण विभागाने सांगली जिल्हयातील काही गावांमध्ये क्षारपड जमीन सुधारणेसाठी सच्छिद्र निचरा प्रणालीचा (Sub Surface Drainage System) अवलंब करण्याची योजना राबविली असून तिची चांगली फलनिष्पत्ती झाली आहे. कोल्हापूर जिल्हयातील शिरोळ तालुक्यातील सुमारे ९४०० हे. जमिन रासायनिक खताचा अति वापर, जादा प्रमाणातील सिंचन, नैसर्गिक ओढे व नाले या मधील अवरोध इ. कारणामुळे क्षारपड व पाणथळ होऊन नापिक ठरलेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर जलसंधारण विभागाने मौजे मजरेवाडी, आकीवाट, तेरवाड-१ व तेरवाड-२, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथे सच्छिद्र निचरा प्रणालीव्दारे सुमारे ७३२ हे. क्षारपड जमीन सुधारणा करणेबाबत ₹ १६६४.८७ लाख प्रकल्प किंमतीचा प्रस्ताव राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूरीस्तव सादर केला होता. या योजनेच्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीची (SLSC) २५ वी बैठक दि.२५/०७/२०१८ रोजी पार पडली होती, या बैठकीत समितीने केंद्र शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहुन सदर प्रस्तावास तत्वत: मंजूरी प्रदान केली होती. सदर प्रकल्पास केंद्र शासनाने संदर्भांकित दि.०४/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी प्रदान केली असून प्रकल्पास प्रती हेक्टरी ₹ ६०,०००/- याप्रमाणे ₹ ४३९.३१ लाख अनुदान मंजूर केले आहे, आणि त्यानुषंगाने पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत समस्याग्रस्त जमिन सुधारणा (Reclamation of Problematic Soil) या उप-योजनेंतर्गत केंद्र हिश्श्याचा ₹ १.३२ कोटी निधी संदर्भांकित दि.१३/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये वितरीत केलेला आहे. अशाप्रकारे सदर प्रकल्प राबविण्याकरिता केंद्र हिश्श्याचा ₹ १.३२ कोटी व समरुप राज्य हिश्श्याचा ₹ ०.८७ कोटी असा एकूण ₹ २.१९ कोटी निधी वितरणासाठी उपलब्ध झाला आहे. केंद्र शासनाची सदर प्रकल्पास प्राप्त झालेली मान्यता तसेच, या प्रकल्पाकरिता प्राप्त झालेल्या निधीच्या पार्श्वभूमीवर सदर प्रकल्प राबविण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णयः

१. या शासन निर्णयान्वये कोल्हापूर जिल्हयातील मौजे मजरेवाडी (२५३ हेक्टर), आकीवाट (३५८ हेक्टर), तेरवाड-१ (६४.८० हेक्टर) व तेरवाड-२ (५६.३८ हेक्टर) ता. शिरोळ या गावांतील एकूण ७३२.१८ हेक्टर क्षेत्रावर सच्छिद्र निचरा प्रणालीचा (Sub Surface Drainage System) वापर करून क्षारपड जमीन सुधारणा कार्यक्रम राबविण्याकरिता ₹ १६६४.८७ लाख निधीचा प्रकल्प राबविण्यास तसेच, या प्रकल्पांतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत समस्याग्रस्त जमिन सुधारणा कार्यक्रम (RPS) या उप-योजने अंतर्गत प्रती हेक्टरी ₹ ६०,०००/- अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. या प्रकल्पांतर्गत एकुण ७३२.१८ हेक्टर क्षारपड जमीन क्षेत्रावर सच्छिद्र निचरा प्रणालीचा उपचार करण्याकरिता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत टप्प्याटप्प्याने एकूण ₹ ४३९.३१ लाख अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांनी राबवावयाच्या प्रकल्पांतर्गत घटक / उपचाराचा आराखडा खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे राहील, सदर आराखडयातील अनु. क्र. १, २ व ३ या घटकांची शेतकऱ्यांनी स्व-निधीतुन अंमलबजावणी करावयाची असून अनु.क्र.४ येथील सच्छिद्र निचरा प्रणाली या घटकाकरिता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत समस्याग्रस्त जमिन सुधारणा कार्यक्रम (RPS) या उप-योजने अंतर्गत प्रती हेक्टरी ₹ ६०,०००/- अर्थसहाय्य लाभार्थी शेतकऱ्यांना अनुज्ञेय राहील.

(रुपये लाखात)

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>घटक</th><th>प्रकल्प क्षेत्र</th><th>प्रकल्प किंमत</th><th>राकृवियो अंतर्गत अर्थसहाय्य</th></tr>
<tr><td>१</td><td>प्रक्षेत्र विकास, बांध बंधिस्ती, पाण्याचा पाट, जमिनीस आकार देणे (On farm Development, bunding, irrigation channel, land shaping)</td><td rowspan="4">७३२.१८ हे.</td><td rowspan="3">लाभार्थी शेतकऱ्यांनी स्व-निधीतुन राबवावयाच्या बाबी</td><td rowspan="3">निरंक</td></tr>
<tr><td>२</td><td>भू-सुधारक (Soil amendment (5 tonnes/ha))</td></tr>
<tr><td>३</td><td>हिरवळीची खते, ऊसाचे बेणे, खते व औषधे (Green Manuring, sugarcane ratoon (seed)] fertilizers and chemicals)</td></tr>
<tr><td>४</td><td>सच्छिद्र निचरा प्रणाली (Sub-surface drainage system (Excavation & refilling of soil, corrugated pipeline, its fitting & laying, construction of outlets))</td><td>१६६४.८७</td><td>४३९.३१</td></tr>
</table>

३. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून जलसंधारण विभागाच्या अधिनस्त मुख्य अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर) राहतील, या प्रकल्पाची अंमलबजावणी सदर यंत्रणेच्या जिल्हा कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर) यांच्या पर्यवेक्षणाखाली करण्यात यावी. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती परिशिष्ट “अ” येथे नमूद केली आहे त्यानुषंगाने, जलसंधारण विभागाने सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात.

४. सन २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजना - रफ्तार या योजनेंतर्गत समस्याग्रस्त जमिन सुधारणा (RPS) उप-योजने अंतर्गत पहिल्या टप्प्यात केंद्र शासनाचा ₹ १३२ लाख व त्यास समरुप राज्य हिश्श्याचा

₹८७ लाख असा एकूण ₹२१९ लाख (रुपये दोनशे एकोणीस लाख फक्त) निधी आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे पुढीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(रक्कम ₹ लाख)

अ. क्र.	योजनेचे नाव	मंजूर निधी (६०:४०)		
		केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	एकूण
१.	राष्ट्रीय कृषि विकास योजना (समस्याग्रस्त जमिन सुधारणा कार्यक्रम) (Reclamation of Problematic Soil)	१३२	८७	२१९

५. सदर ₹ २१९ लाख निधीतुन मौजे मजरेवाडी (२४४ हे.), तेरवाड-१ (६४.८० हे.) व तेरवाड-२ (५६.३८ हे.) ता. शिरोळ जि. कोल्हापूर येथील एकूण ३६५.१८ हे. जमिनीवर सच्छिद्र निचरा प्रणालीव्दारे क्षारपड जमिन सुधारणा योजना राबविण्यास सदर गावातील पुढील शेतकरी गटांना मंजूरी देण्यात येत आहे

गावाचे नाव	गटाचे नाव	सभासद शेतकरी	प्रकल्प क्षेत्र (हेक्टर)	राकृवियो अनुदान (रु. लाख) (@ रु.६०,००० प्रती हेक्टर))
मजरेवाडी	श्री गुरूदत्त किसान समुह गट	२८७	२४४	१४६.४
तेरवाड-१	श्री गुरूदत्त किसान समुह गट-१	७०	६४.८०	३८.८८
तेरवाड-२	श्री गुरूदत्त किसान समुह गट-२	५१	५६.३८	३३.८२
एकूण		**४०८**	**३६५.१८**	**२१९.१०**

६. परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद केल्यानुसार, राष्ट्रीय कृषि विकास योजना - रफ्तार या योजनेंतर्गत केंद्र हिस्याचा ₹ १३२ लाख (रुपये एक कोटी बत्तीस लाख फक्त), आणि राज्य हिस्स्याचा ₹ ८७ लाख (रुपये सत्याऐंशी लाख फक्त) असा एकूण ₹ २१९ लाख (रुपये दोन कोटी एकोणिस लाख फक्त) निधी उपलब्ध करुन दिला असून तो योजनेच्या केंद्र व राज्य हिस्स्याच्या पुढील लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ मध्ये अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा -

केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा
मागणी क्रमांक डी -३ २४०१- पीक संवर्धन (००) (८००) इतर खर्च (००) (०९) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना) (६० टक्के केंद्र हिस्सा) (२४०१ ८२३५) ३३-अर्थसहाय्य	मागणी क्रमांक डी -३ २४०१- पीक संवर्धन (००) (८००) इतर खर्च (००) (११) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना) (४० टक्के राज्य हिस्सा) (२४०१ A२२५) ३३-अर्थसहाय्य

७. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या ₹ २१९ लाख रक्कमेचे कोषागारातून आहरण व वितरणाकरिता सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

८. सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध झालेली ₹ २१९ लाख रक्कम कोषागारातून आहरित करुन आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावे उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी लेखा खाते (Personal Ledger Account) मध्ये जमा करावी व तसे शासनास अवगत करावे आणि तद्नंतर सदर निधी संबंधित प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी मुख्य अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर) यांना वर्ग करावा.

९. उपरोक्त मंजूर निधीचे तात्काळ उपयोजन होण्याच्याद्दष्टीनेच कोषागरातून आहरण करावे आणि विभागाने त्यांना प्राप्त होणाऱ्या निधीचा तात्काळ विनियोग करावा ,अंमलबजावणी यंत्रणांनी निधी उपयोजनाविना बँक खात्यामध्ये जमा करुन ठेवू नये.

१०. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सन २००७-०८ पासून सन २०१७-१८ पर्यंत विविध विभागांना वितरीत केलेल्या निधीचे लेखापरीक्षण होऊन तसे प्रमाणित केल्यानंतर सदर योजनेंतर्गत उर्वरीत निधी दुसऱ्या टप्प्यामध्ये केंद्र शासनाकडून वितरीत करण्यात येणार आहे, त्यामुळे अंमलबजावणी यंत्रणेने/विभागाने त्यांना सन २००७-०८ ते सन २०१७-१८ या कालावधीत वितरीत केलेल्या निधीचे सनदी लेखापालांकडून लेखापरिक्षण झाल्याचे प्रमाणित करावे .

११. वैयक्तिक लाभाच्या प्रकल्पांतर्गत सर्व विभागांनी / अंमलबजावणी यंत्रणांनी लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) अनुदान वितरीत करावे.

१२. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२/०४/२०१८ नुसार विहीत केलेल्या अटींची पुर्तता होत असल्याने तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१३. हा शासन निर्णय जलसंधारण विभागाच्या सहमतीने व मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८१३५८२७८४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2019.03.08 15:09:06 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव (जलसंधारण), मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. मुख्य अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर), पुणे

८. संचालक (प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
९. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
१०. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१२. कार्यकारी अभियंता, लघु सिंचन, (स्थानिक स्तर), जि. कोल्हापूर.
१३. सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
१४. वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
१५. मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१६. मा. राज्यमंत्री (कृषि, पाणी पुरवठा व स्वच्छता व पणन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१७. निवड नस्ती.

परिशिष्ट - "अ"

कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.राकृवि-०३१९/प्र.क्र.७४/१४-अे, दि.८/३/२०१९ चे सहपत्र

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत समस्याग्रस्त जमिन सुधारणा (RPS) या उप-योजनेंतर्गत

सच्छिद्र निचरा प्रणालीचा वापर करून (SSD) मौजे मजरेवाडी, आकीवाट, तेरवाड - १ व तेरवाड - २ ता. शिरोळ, जि. कोल्हापूर या गावातील क्षारपड जमीन सुधारणा प्रकल्प अंमलबजावणीची कार्यपध्दती.

i. क्षारपड जमीनीवर सच्छिद्र निचरा प्रणालीचा अंवलब करणे हा क्षेत्र उपचार असून तो शेतकऱ्यांनी सामुदायिकरित्या अवलंबावा म्हणून कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर) यांच्या पर्यवेक्षणाखाली आत्मा अंतर्गत स्थापन झालेले शेतकऱ्यांचे गट अथवा शेतकरी उत्पादक कंपनी सदर प्रकल्पाची प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष अंमलबजावणी करतील.

ii. या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद केल्यानुसार अनु. क्र. १, २ व ३ या घटकांची शेतकऱ्यांनी स्व-निधीतुन अंमलबजावणी करावयाची असून त्याकरिताच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन या बाबींची कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर) यांच्या पर्यवेक्षणाखाली गटाच्या स्तरावर अंमलबजावणी करावी.

iii. या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद केल्यानुसार केवळ अनु.क्र.४ येथील सच्छिद्र निचरा प्रणाली या घटकाकरिता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अर्थसहाय्य देय राहणार आहे. त्याकरिता शेतकऱ्यांच्या गटांनी / शेतकरी उत्पादक कंपन्यांनी क्षारपड जमीनीवर सच्छिद्र निचरा प्रणालीचा अंवलब करण्यासाठी स्वखर्चाने सनदी स्थापत्य अभियंत्यांची नियुक्ती करावी. याकरिता स्थापत्य अभियंत्यांना द्यावयाचे मानधन / सेवाशुल्क व त्यावरील कर इ. खर्च शेतकरी गटाने स्व-निधीतून भागवावयाचा आहे.

iv. शेतकरी गटाने नियुक्त केलेल्या सनदी स्थापत्य अभियंत्यामार्फत प्रक्षेत्राचे सर्वेक्षण करुन केंद्रीय क्षारपड जमीन संशोधन संस्था, कर्नाल, हरियाणा (CSSRI) यांनी भारी काळया जमीनीसाठी (Deep Black Cotton Soil-Vertisols) शिफारस केलेल्या बंदिस्त निचरा प्रणालीच्या संकल्पनानुसार प्रकल्प अंमलबजावणीचे संकल्पचित्र व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन घ्यावे.

v. शेतकऱ्यांच्या गटांनी / शेतकरी उत्पादक कंपन्यांनी त्यांच्या प्रक्षेत्राकरिता सनदी स्थापत्य अभियंत्यांनी तयार केलेल्या प्रकल्प अंमलबजावणीचे संकल्पचित्र व खर्चाचे अंदाजपत्रकास ठराव घेऊन मान्यता द्यावी. त्याचप्रमाणे, सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता शेतकऱ्यांच्या गटांनी / शेतकरी उत्पादक कंपन्यांनी सभासद शेतकऱ्यांना बँक कर्ज व स्व-निधीतून आवश्यक निधी उभारण्याचे सुचित करावे. अशाप्रकारे गटातील सर्व सभासद शेतकऱ्यांनी बँकेमार्फत व स्व-निधीतुन व्यक्तिगत क्षेत्राकरिता प्रकल्प अंमलबजावणीसाठी आवश्यक निधीची उभारणी करावी. त्याचप्रमाणे शेतकरी गट या प्रकल्पाकरिता आवश्यक असलेला निधी तसेच शेतकऱ्यांच्या बँक कर्जावरील व्याजास सवलतीसाठी खाजगी कंपन्यांच्या सी.एस.आर. फंडातुन निधी ऊभारू शकतील.

vi. प्रकल्प अंमलबजावणीकरिता आवश्यक निधीची उभारणी झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या गटांनी / शेतकरी उत्पादक कंपन्यांनी व सदर निधीतुन प्रकल्प राबविण्यास सनदी स्थापत्य अभियंत्यांना कार्यारंभ आदेश निर्गमित करावा व त्याबाबत कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर) कोल्हापूर यांना अवगत करावे.

vii. प्रकल्पांतर्गत कामे कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर) यांच्या पर्यवेक्षणाखाली करावयाची असून प्रकल्पासाठी नियुक्त केलेल्या सनदी स्थापत्य अभियंत्यांनी तसेच संबंधित शेतकऱ्यांच्या गटांनी / शेतकरी उत्पादक कंपन्यांनी वेळोवेळी कामाचा प्रगती अहवाल कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर) यांना सादर करावा.

viii. कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर) यांनी शेतकऱ्यांच्या गटांच्या / उत्पादक कंपनींच्या प्रकल्प क्षेत्रास वेळोवेळी भेट द्यावी व प्रकल्पाच्या प्रगतीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन प्रकल्प शास्त्रोक्त पध्दतीने राबविण्याच्या दृष्टीने आवश्यक सुचना द्याव्यात. त्याचप्रमाणे, गटांच्या / उत्पादक कंपनींच्या प्रकल्पांतर्गत कामे पुर्ण झाल्यानंतर मोका तपासणी करुन सनदी स्थापत्य अभियंत्यामार्फत प्रकल्पांतर्गत सर्व बाबींची शास्त्रोक्त पध्दतीने अंमलबजावणी झाल्याचे कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर) यांनी प्रमाणित करावे.

ix. प्रकल्पांतर्गत सच्छिद्र निचरा प्रणाली ही क्षेत्र उपचार पध्दती आहे त्यामुळे प्रकल्प मंजुरी देण्यात आलेल्या शेतकरी गटाच्या संपूर्ण प्रक्षेत्रावर सर्व सभासद शेतकऱ्यांनी प्रकल्पाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील व गटाकरिता मंजूर प्रक्षेत्रावर सर्व शेतकऱ्यांनी सच्छिद्र निचरा प्रणाली बसवून प्रकल्प पूर्ण केल्यानंतरच गटातील शेतकरी अनुदानासाठी पात्र राहतील. या प्रकल्पांतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांना संपूर्ण गटाचा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वैयक्तिक शेतकऱ्यांच्या बँक कर्ज खात्यावर अनुदान अदा करण्यात येईल (Credit Linked Back ended Subsidy).

x. संबंधित गटांच्या / उत्पादक कंपनींच्या सभासद शेतकऱ्यांना अर्थसहाय्य केलेल्या राष्ट्रीयकृत बँकेचे निधी उपयोगिता प्रमाणपत्र / प्रकल्प पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र तसेच, सनदी स्थापत्य अभियंत्यामार्फत प्रकल्प पूर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र घेऊन कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर) यांनी प्रकल्प मंजुरी दिलेल्या शेतकरी गटाच्या संपूर्ण प्रक्षेत्रावर प्रकल्पाची अंमलबजावणी पूर्ण झाल्याचे मोका तपासणीअंती प्रमाणित करुन प्रकल्पाची अंमलबजावणी करणाऱ्या संबंधित गटांच्या / उत्पादक कंपनींच्या सर्व सभासद शेतकऱ्यांना अनुदान वितरणाची शिफारस शासनास करावी

xi. अनु. क्र. X नुसार कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर) यांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावरुन राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत समस्याग्रस्त जमिन सुधारणा कार्यक्रम (Reclamation of Problematic Soil) या उप-योजने अंतर्गत निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

xii. शासनाने निधी वितरीत केल्यानंतर कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (स्थानिक स्तर) यांनी प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी रु.६०,०००/- याप्रमाणे त्यांच्या आधार संलग्न बँक कर्ज खात्यावर अनुदान जमा करावे व सदर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.